# भारत आणि चीन : सुरक्षा विषयक व अर्थविषयक धोरणांचा तुलनात्मक आढावा

**डॉ. तांदळे डी.आर.,**
राज्यशास्त्र विभाग,
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई, जि.बीड

भारताला स्वातंत्र्य मिळाले. त्यानंतर दोनच वर्षात 1949 मध्ये चीनमध्ये साम्यवादी क्रांती झाली. सुरूवातीपासूनच भारताने चीनबरोबर सलोख्याचे धोरण ठेवले. तिबेट संबंधी चीनची भूमिका मान्य केली. भारताचे मुख्य उद्दिष्ट होते पाकिस्तान आणि चीन यांना एकत्र येण्यापासून रोखणे. सिमाप्रश्न जटील होता. 1962 साली द्विराष्ट्रीय संबंध बिगडून ईशान्येकडील भातरचा काही प्रदेश काबीज करूनच युध्द थांबले.

चीन व पाकिस्तानची मैत्री दृढ होत गेली. त्याचा परिणाम म्हणून पाकिस्तानला चीनने शस्त्राबरोबरच क्षेपणास्त्र व अण्वस्त्राचे तंत्रज्ञानही पुरविले. चीन व पाकिस्तानला रोखण्यात भारताला अपयश आले. भारताच्या होणाऱ्या प्रगतीबद्दल साशंक असणाऱ्या नेपाळ, भूतान, म्यानमारने चीनशी मैत्री प्रस्थापित केली. भारताच्या चिंतेचा विषय म्हणजे शेजारी राष्ट्रावरील चीनचा वाढता प्रभाव, मोरारजी देसाई व राजीव गांधी या पंतप्रधानाच्या कारकिर्दीत 1962 साली बिघडलेले द्विराष्ट्रीय राजनायिक संबंध 1976 मध्ये पुन्हा प्रस्तापित झाले. राजीव गांधीच्या 1987 च्या चीन भेटीनंतर सीमा प्रश्न सोडविण्यासाठी संयुक्त कार्यकारी गट अस्तित्वात आला. तरीही काही निष्पन्न झाले नाही. सिक्कीमच्या भारतात झालेल्या विलीनीकरणास जवळजवळ तीन दशकानंतर चीनने मान्यता दिली.

रशिया, चीन आणि भारत त्रिराष्ट्रीय चर्चाही हळूहळू कालौघात सकारात्मक आकार घेऊ लागलेल्या दिसत आहेत. राष्ट्रीय सुरक्षेचा विचार करताना भारताने सहसा आं.रा. सुरक्षेचा विचार नजरेआड होऊ दिला नाही असे आढळते. शास्त्रस्त्र स्पर्धा, राजनय, व्यापार ही सुरक्षेची वेगवेगळी साधने आहे.

70 च्या दशकाच्या अखेरीपासून शस्त्राच्या आयाती बाबतचे सोव्हिएत संघावर अवलंबून राहणे कमी करण्याचे प्रयत्न फ्रान्स, जर्मनी सारख्या पाश्चात्य देशाकडून शस्त्रे मिळविण्याचा प्रयत्न सुरू झाला. भारताने 1974 मध्ये पहिली अणू चाचणी केली. अणुचाचणीनंतर अण्वस्त्र क्षमता भारताच्या सामर्थ्याचा भाग बनली. ते सामर्थ्याचे चलन बनले. 1983 मध्ये भारताने एकात्मिक क्षेपणास्त्र विकासाचा पाया घातला. राजीव गांधीच्या काळात भारताने शक्ती प्रदर्शन हे सुरक्षा धोरणाचे अंग मानले.

राष्ट्रीय असो अथवा आंतरराष्ट्रीय असो डावपेचात्मक राजकारणाचा प्रमुख हेतू हा असलेली सत्ता टिकवून ठेवणे किंवा कोणाकडून तरी सत्ता मिळविणे हाच दिसून येतो.

पाकव्याप्त काश्मीरच्या गिलगिट बल्टिस्तान परिसरात चिनी लष्काराच्या मुक्त संचारामुळे भारताला धोका निर्माण झाला आहे. या हालचालींमुळे ड्रॅगनची नेमकी काय चाल आहे असा प्रश्न पडतो. त्याचे उत्तर शोधताना हा विषय केवळ गिलगिट पुरताच मर्यादित नाही तर त्याला विविध स्वरूपाचे कंगोरे असल्याचे लक्षात येते. अमेरिकेचे धोरण लक्षात घेऊन संरक्षण क्षेत्रात अफाट गुंतवणूक करणारा चीन सध्या जी धोरणात्मक योजना आखीत आहे त्यात प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे भारतालाही गर्भित इशारा देण्याचा भाग आहे. महासत्ता बनण्याच्या दिशेने मार्गक्रम करणारा चीन आणि दहशतवादाने पोखरलेला पाकिस्तान यांच्यातील दृढमैत्रीने जेव्हा संधी मिळेल तेव्हा भारताला अडचणीत आणले आहे. पाकव्याप्त काश्मीरात सध्या

पाकिस्तानी कमी आणि चिनी ज्यादा अशी स्थिती आहे. ही भारतासाठी चिंतेची बाब आहे.

युध्दाची बदलणारी परिभाषा जो देश जितक्या लवकर आत्मसात करील तोच प्रभावी हे तंत्र लक्षात घेऊन आपल्या पारंपारिक तंत्रात बदल करण्यात सध्या आघाडीवर असलेल्या चीनने सर्वच क्षेत्रावर वर्चस्व गाजविण्याचे प्रयत्न चालविले आहेत. हे वाढते वर्चस्व भारतासाठीच नव्हे तर बलाढ्य अमेरिकेसाठीही चिंतेची बाब ठरले आहे. युध्द केवळ लष्करी पातळीवरच लढले जाते असे नव्हे. चीनच्या सध्याच्या हालचालीकडे पाहते हे डावपेच म्हणजे भारताविरूध्दच्या छुप्या युध्दाचाच भाग असावा असे दिसते. बलुचीस्तानमधील ग्वादार या नव्या बंदराचा विकास केल्याने चीनला आणखी एक संधी मिळाली आहे. या बंदराचा संबंध गिलगिटमध्ये कार्यरत चिनी लष्कराशी आहे. 9/11 च्या दहशतवादी हल्यानंतर अफगाणिस्तानमधील अमेरिकी फौजा आणि त्या पाठोपाठ चीनने केलेल्या या ग्वादार बंदराचा विकास तसेच ग्वादार बंदर ते कराची या महामार्गासाठी 300 कोटी अब्ज डॉलर्सची गुंतवणूक करण्याचा निर्णय चीनने घेतला. चीन-पाक या राष्ट्राच्या आर्थिक विकासाला नवे परिणाम देण्याची क्षमता बंदरात आहे.

आशिया खंडात वर्चस्वासाठी भारताच्या शेजारी राष्ट्रांना आपल्या गटात समाविष्ट करीत चीन त्या प्रत्येक राष्ट्रात पायाभूत सुविधांच्या उभारणीत गुंतला आहे. श्रीलंकेशी सामंजस्य करार करून हंब्मनतोना प्रकल्पात बंदर विकास, खनिज तेल प्रक्रिया केंद्र, विमानतळ आणि तत्सम सुविधेसाठी प्रचंड गुंतवणूक केली. त्यात केवळ खनिज तेलाचे सागरी मार्ग आणि मल्लकाच्या सामुद्रधुनीवर लक्ष केंद्रित करण्याचा त्याचा हेतू नसून या माध्यमातून चिनी नौदलाचे हिंदी महासागरात अस्तित्व निर्माण करण्यात चीन यशस्वी झाली आहे. क्वांघाय ते ल्हासापर्यंतचा लोहमार्ग नेपाळ आणि भारत-चीन सरहद्दीजवळील नथुराला खिंडीनजीकच्या डोंगरापर्यंत विस्तरला जाणार आहे. द. आशियातील चीनचे महत्व लपून राहिलेले नाही. यावरून चीन भारताला एकाकी पाडण्याच्या प्रयत्नात असल्याचेच दिसते.

सध्या चीनचे लष्कर ज्या भागात आहे त्या गिलगिट वझारतचा परिसर पाकव्याप्त काश्मीरमध्ये आहे. पाकिस्तान व चीनच्या मैत्रीपूर्ण संबंधात काराकोरम महार्गाला विशेष महत्व आहे. या मार्गापासून सियाचेन टापू बराच लांब असला तरी तो भारतातील सर्वाधिक उंचीचा भाग आहे. जनल अरूणकुमार यांनी हा भाग व्यापण्याचा पाकिस्तानने केलेला प्रयत्न हाणून पाडला तेंव्हापासून या भागात भारतीय लष्कर तैनात करणे अपरिहार्य ठरले. 1983 नंतरच्या घुसखोरीच्या घटनेनंतर काराकोरम महामार्गीचा व्यापारी वाहतूकीसाठी वापर सुरू झाला. संघर्षाची संभाव्य ठिणगी हिमालयाच्या पर्वतराजीत पडल्यास भारतीय लष्कराला चीन व पाकिस्तान या दोघांशी एकाच वेळी दोन हात करावे लागू शकतात. तिबेटमये चीनने रेल्वे आणल्यावर भारताने अरूणाचल प्रदेशामध्ये सर्व ऋतूत वाहतूकीस योग्य रस्ते बांधण्यास सुरूवात केली. आसाममध्ये तेजपूर हवाई तळावर सुखोई या अत्याधुनिक विमानाचे तेजपूर हवाई तळावर सुखोई या अत्याधुनिक विमानाचे पथक हलविण्यात आले. चीनच्या सिमावर्ती भागात घुसखोरीच्या घटना वाढण्याने हवाई टेहाळणी करणाऱ्या खर्चाचा अधिकाधिक ताण भारतीय अर्थव्यवस्थेवर टाकण्याचा चीनचा प्रयत्न आहे. लष्करी सज्जतेसाठी देशाची अर्थव्यवस्था हा कळीचा मुद्दा आहे. आर्थिक सुधारणा आणि खुलेपणा हा चिनी धोरणाचा अविभाज्य भाग असून तो या पुढेही कायम राहणार असे दिसत आहे. या सर्वांची परिणीती अखेर शास्त्रस्त्र स्पर्धेत झाल्याचे अधोरेखीत होत आहे.

शांघाय सहकार्य संघटनेच्या माध्यमाने रशिया व चीन संबंध प्रस्थापित झाले. रशिया व मध्य आशिया यांच्या बरोबर आर्थिक संबंध प्रस्थापित करून चीन आंतरराष्ट्रीय व्यापार करण्यात एक प्रमुख यशस्वी देश ठरला आहे. गेल्या पाच वर्षात (2011 पूर्वी) चीनने शांघाय सहकार्य संघटनेतील दुसऱ्या सदस्य देशाकडून

पाईप लाईनने तेल व वायू मिळविण्यात यश मिळविले. आपल्या ऊर्जेची मागणी पुरी करण्याच्या दिशेने मोठे पाऊ उचलले. भारत आणि या दोन्ही देशाच्या अर्थव्यवस्थांनी जरूर दखलपात्र कामगिरी केली आहे. तरीही यातील कमजोर दुवे दुर्लक्षित राहिले. या दोन्ही देशांना त्यांच्या अर्थव्यवस्था भरभराटीला आणावयाच्या असतील तर पारंपारिक शहाणपणाच्या कक्षा आणि गुणवत्ता यांच्यात वाढ करावी लागेल.

अर्थशास्त्र एकंदर उत्पादन नव्हे तर मूल्यवर्धन व्हॅल्यू ॲडिशन महत्वाचा मानतांना दिसते. उत्पादनांचे प्रमाणे मोठे असेल पण मूल्यवर्धनाचा प्रश्न आला की तो मागे पडतो. जागतिक उत्पादनातून होणारी आवक पाहिली किंवा मूल्यवर्धनाचा मुद्दा तपासला तर चीनचे योगदान 15 टक्के, जपान 15 टक्के, अमेरिका 24 टक्के आणि युरोप 20 टक्के च्या आसपास आहे. आज तरी चीन या अर्थाने जायंट नाही. 17 भारतातील सेवा क्षेत्रराने मारलेली मजल कौतुकास्पद आहे. सेवा क्षेत्राने नेत्रदपक कामगिरी केली तरीही भारतीय अर्थव्यवस्थेचा काया कल्प होण्यासारखी स्थिती नाही. कारण आजही दोन तृतीयांश रोजगार हे (२/३) प्राथमिक क्षेत्रातील आहेत. ग्लोबलयझेशनमुळेच गरिबी हटू लागली असे चित्र निर्माण केले जाते. जर आपण दरडोई उत्पन्न दर दिवसाला अगदी एक डॉलर इतकेच घेतलं तर 1980 ते 2005 या कालावधीत चीनमध्ये 62 कोटी 50 लाख पैकी निम्मे लोक 1980 ते 1987 च्या काळात दारिद्र्य रेषेवर होते. चीनमध्ये जागतिकीकरणाची सुरूवात 1990 च्या दरम्यान झाली आणि 1995 ते 2007 या काळात त्याने वेग घेतला. चीन जागतिक व्यापार संघटनेचा सदस्य बनला.

चीनच्या तुलनेत भारतातील गरिबी अशा मोठ्या प्रमाणात कमी झालेली दिसत नाही. भारतातील दारिद्र्य रेषेखालील लोकांची टक्केवारी घटून 44 टक्के वरून 24 टक्केवर आलेली दिसते. चीनपमेक्षा भारताची लोकसंख्या झपाट्याने वाढत असल्याने दारिद्र्य रेषेखालील लोकांची टक्केवारी घटली तरी गरिबांची संख्या वाढली.

चनी सरकारने कम्युन पध्दत बंद करून शेतकऱ्यांना जमीन कसण्याचे व्यक्तिगत हक्क दिले. शुध्द उदारमतवादी धोरण नसले तरी सर्वांना समान क्षेत्रफळाची जमीन दिली. भारतात शेतीवर अवलंबून असलेली 40 टक्के हून अधिक लोकसंख्या भूमिहीन आहे.

**सारांश / निष्कर्ष :**

महासत्ता बनवण्याच्या प्रक्रियेत आशिया खंडात भारत हा चीनला अडसर ठरतो असे वाटल्यावरून चीन राजकीय, आर्थिक, लष्करी बळाचा धाक दाखवून व हस्तक्षेप करून दबाव तंत्राचा अवलंब करतो आहे. चीनचे हे प्रयत्न ज्या प्रमाणात गतिशील होतील त्या प्रमाणात भारतापुढील आव्हानांची संख्या वाढत जाईल ही निश्चित. पाकव्याप्त काश्मीरमध्ये पाकिस्तानी कमी व चिनी जास्त अशी स्थिती दिसते आणि ती भारतासाठी सतत डोकेदुखी ठरणारी आहे.

चीनपासून असलेल्या धोक्यास आळा घालण्यासाठी भारताचे चीनशी संबंध सुधारण्यासाठी सुरक्षेसाठी मार्ग स्विकारला. परंतु चीनचा कामगार वर्गाचे संघटन संयोजन आणि सज्जता अपूर्ण म्हणावी लागेल आणि कामगार वर्गाचे मित्रबळ म्हणजे शेतकरी ही सर्वकष नियोजनपध्दत व तिची कठोर अंमलबजावणी याचा परिणाम वेगाने राष्ट्रीय उत्पन्न वाढण्यात झाला. या बाबीही भारताने लक्षात घेऊन नियोजन करणे आवश्यक आहे. तरच बड्या राष्ट्राचे आपण होयबा म्हणविले जाणार नाहीत.

**संदर्भ सूची :**

१. अरूणा पेंडसे व उत्तरा सहस्त्रबुध्दे : आ.रां. संबंध : शीतयुध्दोत्तर व जागतिकीकरणाचे राजकारण, पृ. 229.
२. डॉ. आर.जी. गिड्डहुबळी (लेख) : लोकसत्ता : मुंबई, बुधवार दि. 29-6-11
३. एस.एम. यादव (लेख) : लोकसत्ता, सोमवार दि. 30-08-2011.

४. प्रतिमा जोशी (लेख) : महाराष्ट्र टाईम्स, २ जुलै 2011.

५. म. गांधीजी : हिंद स्वराज्य परमधाम प्रकाशन, पवनार पृ. 60

६. कित्ता.

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com